# सेवक वार्ता

जुलै - २०२६

वर्ष - ७ अंक - ९

सेवानिवृत्त वनकर्मचारी संघ, महाराष्ट्र परिवाराचे विविध उपक्रम, विचारमंथन, घडामोडी, साहित्य याचे संवाद पत्र


## सेवक संघाचे कार्यास श्री. बळवंत सेलुकरांचे बळ

## बांबू रोपवनांचे मूल्यांकन करण्याबाबत सेवक कडून प्रस्ताव सादर

सेवक संघाचे नागपूर स्थित सचिव श्री. बळवंत सेलुकर यांच्या धडाडीन व पुढाकाराने काही उपयुक्त कामे करण्यात येत आहेत. त्यात नुकतेच, महाराष्ट्र बांबू विकास मंडळाकडील विविध योजना अतर्गत खाजगी व्यक्तींनी खाजगी क्षेत्रावर केलेल्या बांबू रोपवनांचे मूल्यांकन करण्याबाबत सेवक संघाकडून प्रस्ताव पत्र सादर केले आहे. त्यात खालील मुख्य मुद्दे समाविष्ठ आहेत.

१) रोपवन स्थळाच्या १००% क्षेत्राचे मूल्यांकन केले जाईल.

२) मूल्यांकन केल्या जाणाऱ्या स्थळाचा 'पॉलिगॉन' उपलब्ध करून दिल्या जाईल.

३) वृक्षारोपणाची माहिती प्रजातीनिहाय उपलब्ध करून दिली जाईल.

## सेवक संघ, चंद्रपूर शाखेची सर्वसाधारण सभा संपन्न

सेवक संघ चंद्रपूर शाखेचीची सर्वसाधारण सभा रविवार दि. 12/06/2025 रोजी सकाळी 11 वाजता सेवक सभासद श्री नामदेव कापसे से. नि. वन परिक्षेत्र अधिकारी रा. सिंदेवाही यांचेकडे ठेवण्यात आली होती. तरी सर्व सभासदांनी वेळेवर यावेत.

सभा विषय खालीलप्रमाणे होते.

1.. मागील सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.

2.. जमा खर्चाचा हिशोब ठेवणे.

3.. नविन सभासद वाढविण्यासाठी चर्चा करणे.

4.. चंद्रपूर शाखेचे कार्यकारिणीत पदाधिकारी निवडणे बाबत.

5.. अध्यक्षांचे परवानगीने वेळेवर येणारे विषय.

## डॉ. नामदेव कापसे, सेवक सभासद यांचा सत्कार

डॉ. श्री. नामदेव कापसे से.नि. वनपरिक्षेत्र अधिकारी सेवक सभासद यांच्या कार्याची दखल घेऊन सेवक संघ चंद्रपूर , शाखा यांनी सिंदेवाही येथे दि. 12/7/2026 रोजी सत्कार सिंदेवाही, जि. चंद्रपूर येथे शाल व श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला आहे.



श्री नामदेव कापसे यांचा सत्कार करताना सेवक संघ चंद्रपूरचे पदाधिकारी व सभासद.

श्री. कापसे यांच्या या सत्काराचे कारण खालील पुस्तकाचे लेखन व प्रकाशन होय.

1. महाराष्ट्रातील औषधी वनस्पती
2. बांबू लागवड काळाची गरज
3. औषधी व सुगंधी वनस्पती लागवड काळाची गरज
4. फॉरेस्ट नर्सरी रायझर कोर्स मार्गदर्शिका

तसेच 2025/2026 वर्षामध्ये अनेक संस्था कडून मिळालेले सन्मान पुरस्कार मिळाले आहेत.

## श्री. बट्टुलवार, सेवक सभासद यांचा मृत्यू उपरांत नेत्रदानांचा संकल्प ...

श्री सूर्यनारायणआशालू बट्टुलवार, सेवक संघ चंद्रपूर, शाखा सभासद यांनी मृत्यूनंतर आपले शरीर/अवयव दान अंतर्गत नेत्रदान करण्याची प्रतिज्ञा करून मानव सेवेचे एक अतुलनीय, अनुकरणीय उदाहरण घालून दिले आहे. त्यांच्या या उदात्त कार्याने देशाला निश्चितच दिशा दिली जाईल. अशा शब्दात डॉ. दास, Eye Transpalnt Society यांनी अ भि नंदन केले आहे. तसेच या उदात्त कृतीबद्दल त्यांचे परिवाराचे अभिनंदन आणि कौतुक केले आहे.

त्यांचे सेवक संघ परिवारातर्फे विशेष अ भि नंदन.



## असे दुर्मिळ वडील आणि त्यांच्या मुली

अररिया (बिहार) शहरातील प्लस-२ हायस्कूल मध्ये जिल्ह्याच्या पहिल्या डिजिटल शिक्षण केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. या शाळेच्या माजी विद्यार्थीनी आणि बिहारचे माजी मुख्य वनसंरक्षक (IFS) दिवंगत उपेंद्र प्रसाद यांच्या कन्या डॉ. विनिता प्रसाद यांनी वडिलांच्या स्मरणार्थ हा स्मार्ट बोर्ड सादर केला. त्यांनी सांगितले की, त्यांच्या वडिलांनी याच शाळेत शिक्षण घेतले आणि आपल्या शिक्षकी कारकिर्दीची सुरुवातही येथूनच केली. डिजिटल बोर्डद्वारे शिक्षण देणारी ही जिल्ह्यातील पहिली सरकारी शाळा आहे. शाळेत बसवलेला आधुनिक डिजिटल बोर्ड आता विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानावर आधारित आणि आकर्षक शिक्षण देईल. या जिल्हा शिक्षण अधिकारी साहेब आलम, डॉ. विनिता प्रसाद आणि मुख्याध्यापक अबरारुल हक यांच्या हस्ते रिबन कापून उद्घाटन करण्यात आले.

स्वर्गीय उपेंद्र प्रसाद श्री. व्ही. टी. पत्की यांचे IFC मध्ये रूममेट होते आणि ते खूप जवळचे मित्र होतो. त्यांची कन्या डॉ. विनीताजींनी अररिया हायस्कूलमध्ये त्यांच्या वडिलांच्या स्मरणार्थ ५० ते ६० लाख रुपये खर्चून डिजिटल लर्निंग सेंटर उघडले आहे. अशा मुली आणि वडील दुर्मिळ आहेत, असे गौरवोद्गार श्री. व्ही. टी. पत्की यांनी काढले.

या शाळेत विद्यार्थी आणि नंतर शिक्षक राहिलेल्या श्री उपेंद्र प्रसाद यांनी बीपीएससी आणि यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण करून १ जुलै १९६८ रोजी भारतीय वनसेवेत प्रवेश केला. तीन दशकांच्या समर्पित सेवेनंतर ते बिहारचे मुख्य वन संरक्षक म्हणून सेवा निवृत्त झाले. सेवानिवृत्तीनंतरही त्यांनी विश्रांती घेतली नाही आणि १९९८ ते २०२१ या २३ वर्षांच्या कालावधीत पाटणा उच्च न्यायालयात वकील म्हणून काम केले. कार्यक्षमता, प्रामाणिकपणा आणि सेवेच्या अदम्य भावनेने घडलेले जीवन होते. हे डिजिटल शिक्षण केंद्र त्यांच्या कुटुंबीयांनी या शाळेला आणि स्वप्न घेऊन या भिंतींच्या आत बसलेल्या सर्व विद्यार्थ्यांना समर्पित केले आहे.



स्व. श्री उपेन्द्र प्रसाद, भारतीय वन सेवा
पूर्व मुख्य वन संरक्षक (एकीकृत बिहार)
10 जुलाई 1939 — 8 जुलाई 2025

## सेवक संघाच्या वतीने वनपाल पदी पदोन्नतीबद्दल सचिव श्री. जयप्रकाश पाटील यांचे हातून सत्कार

वन विभागातील सेवानिवृत्त लेखापाल श्री एल. डी वाघ यांचे चिरंजीव श्री सचिन वाघ यांचे वन परिमंडळ अधिकारी, धडगाव म्हणून पदोन्नती आणि नेमणूक झाली त्याबद्दल त्यांचा यथोचित सत्कार त्यांचे हातून झाला.

तसेच ,श्री. मुकेश गुजर हे वनपाल म्हणून पदोन्नती झालेवर ते पेढे देण्यासाठी त्याकडेस घरी आले त्यांचाही सत्कार केला. त्यांची नेमणूक मेवासी वन वि भाग, तळोदा वनक्षेत्रातील राजविहिर परिमंडलावर झालीआहे.





राहिल्या त्या आठवणी.....




## निलगिरीचे रोपवन

निलगिरी रोपवनाची FOR-२० ही केंद्रशासीत योजना महाराष्ट्रात राबविण्याचे ठरले. लगाम वनक्षेत्रास ७५ हे. रोपवनाचे उद्दिष्ट होते. धन्नूर गावाजवळील वनक्षेत्र लागवडीसाठी निवडले होते. पूर्व पावसाळी कामात सर्वात खर्चिक बाब होती राबासाठी जागा साफ करणे. रु.७५/- प्रती हेक्टर खर्च यासाठी मंजूर होता. हे काम मक्त्याने धन्नूर मधील एका मुस्लीम व्यक्तीने घेतले होते. काम वेळेत व चोख पार पाडले होते. मजूरीची रक्कम हाती पडताच मक्तेदार व्यक्तीने दावत देण्याची इच्छा प्रदर्शित केली. त्याचे झोपडीवजा घरातच दावत होती. तीन-चार मित्र आले तर चालतील काय ? असे माझे विचारल्यावर त्यांनी खुशीने हो म्हंटले. मटन बिर्याणीचा मस्त बेत होता. दावत उपभोगण्यासाठी सर्वश्री अंबासकर/ परब/ संखे/ पावडे हे वन अधिकारी होते. यथेच्छ ताव मारुन आम्ही दावतीचा आनंद घेतला.

## निलगिरीची रोपवाटीका -

चौडमपल्लीचे विहीरीत उन्हाळ्यात पण भरपूर पाणी असते म्हणून तिथेच रोपवाटीका तयार केली होती. Eucalyptis teritocornis प्रजातीची रोपे तयार केली होती. सुमारे दीड लाख रोपे मे अखेर डोलत होती. मे अखेरीस माझा रेंज चार्ज संपला व मी चौडमपल्लीचा निरोप घेतला.

## सब.डी.एफ.ओ., डहाणू -

३१ मार्च १९६७ रोजी परिविक्षाधीन कालावधी पूर्ण झाल्यानंतर, माझी पदस्थापना ठाणे वन वृत्तातील, डहाणू वनविभागात, सब.डी.एफ.ओ., डहाणू या पदावर झाली. पूर्वेकडून मी पश्चिमेला आलो होतो. माझेकडे डहाणू, बोर्डी, कासा, सावा, उधवा वनक्षेत्रांचा कार्यभार होता. श्री. बी. डी. नाडकर्णी हे ५७ वर्ष वयाचे भारदस्त वन अधिकारी माझे डी. एफ. ओ. होते. एखाद्या मेजर जनरलला शोभेल असे त्यांचे व्यक्तीमत्व होते. त्यांचा करडा आवाज सगळ्यांना घाम फोडत असे. श्री. दिनकर वामन खिस्ती हे माझे वन संरक्षक ठाणे येथे होते. ते मूळचे भंडारा जिल्ह्यातील असल्याने, त्यांचे व तेव्हाचे वनमंत्री श्री. नासिकराव तिरपुडे यांचे संबंध सलोख्याचे होते. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाची निर्मित्ती आणि विकास श्री. खिस्ती साहेबांनी सुरू केला. डहाणू वन विभागात त्यावेळी घनदाट, मौल्यवान जंगल होते, परंतु वन जमिनींवर शेतीसाठी अतिक्रमणे होत असत.

## अतिक्रमणे निर्मूलन मोहीम-

तत्कालीन जिल्हाधिकारी श्री. द्वारकानाथ कपूर, श्री. खिस्ती साहेब, श्री. नाडकर्णी साहेब यांनी वन जमिनीवरील अतिक्रमणे निर्मूलनाचा कार्यक्रम गोपनीयपणे शासनाकडून मंजूर करून घेतला होता. त्याच्या अंमलबजावणीकरिता कासा येथे वनाधिकारी, पोलीस अधिकारी, महसूल अधिकारी यांचा मेळावा जून,१९६९ मध्ये जमला होता. सगळे मिळून सुमारे १५० जण कामास सज्ज होते. वनक्षेत्रावरील राबामधील भाताची रोपे कापून नष्ट करण्याचे धोरण होते. कार्यक्रम अंमलबजावणीस सुरूवात झाली. दोन तासांनी प्रगतीचा वरिष्ठांनी आढावा घेतला असता, ती समाधानकारक आढळली नाही, म्हणून काय करावे यावर विचारमंथन झाले. ११४ धुरीयाचा फवारा मारला असता, रोपे मरतात असा शोध जिल्हाधिकारी यांनी जाहीर केला. लगेच काही जणांनी गट विकास अधिकारी, डहाणू यांचे कार्यालयात धाव घेऊन युरीया व स्प्रे पंप गोळा केले व परत कासा येथे आले. या शोधाचे प्रात्यक्षिक सगळ्यांना दाखवून, रोपांऐवजी प्रथम कार्यकर्त्यांच्या माना मुरगळून टाकल्या. आता, स्थानिक आदिवासी आमदार श्री.म. गो. कडू चर्चेला आले. शब्दांची फेका-फेकी झाली आणि वातावरण युध्दमय झाले. डाळ न शिजल्याने, सर्व आदिवासी आमदारांनी मुंबईस जावून शासनावर दबाव तंत्र वापरण्यास सुरूवात केली. तिसरे दिवशी सायंकाळी मोहीम स्थगित करण्याचे आदेश बिनतारी यंत्रणेद्वारे प्राप्त झाले. त्यानंतर सुमारे १५-२०दिवसांनी विभागीय वन अधिकारी, डहाणू यांचे कार्यालयावर आदिवासींचा मोर्चा आला. मोर्चास सामोरे जाऊन अहवाल सादर करण्याच्या सूचना नाडकर्णी साहेबांनी मला दिल्या. देवाचा धावा करित मी, मोर्चास सामोरे गेलो व त्यांचे लेखी निवेदन स्वीकारले. राबातील भाताची रोपे कापून नष्ट करण्याच्या कामाचा त्यांनी निषेध केला होता, पण युरीया स्प्रे द्वारे रोपांना खत देण्यात शासनाने दुजाभाव केला आहे असा आरोप त्यांनी केला होता. सर्व शेतकरी यांचे भाताचे रोपावर युरीया स्प्रे शासनाने करावा अशी विनंती त्यांनी केली होती. मला, हे निवेदन वाचून धक्काच बसला. विभागीय कार्यालयात दोन गोणी युरीया खताच्या होत्या, ते खत मी, मोर्चा प्रमुख श्री. ल. सी. कोम, आमदार यांचे स्वाधीन करुन, माझी सुटका

करून घेतली. जातांनां मोर्चेकरी वन विभाग विजयी होवो अशा घोषणा देत गेले. शहाणपणा आणि मूर्खपणाचा एक अनुभव मला शिकण्यास मिळाला.
(क्रमशः)...

## माझी फोटोग्राफी -८

**प्रमोद यादव, सेनि. भाप्रसे**

**आज तारीख २८ सप्टेंबर 2025**

आज आनंदाचा दिवस होता, कारण माउंट एवरेस्ट बेस कॅम्प सर करण्याचा शेवटचा दिवस होता. 21 तारखेपासून रोज सरासरी 15 किलोमीटर चालत असे. आजचा आठवा दिवस होता. त्यातही उंचसखलपणा,कुठे मोठी चढण कुठे मोठमोठे ट्रेकवर दगड असे. त्यामुळे पंधरा किलोमीटर रोज चालणे तसे अजिबात सोपे नव्हते. आजचा दिवस आमच्यासाठी खास दिवस होता. त्यामुळे उत्साह असला तरी शरीरात ऑक्सिजन लेव्हल कमी झाल्यामुळे चेहऱ्यावर ते एक उसने अवसानच होते.

सुरुवातीला बऱ्यापैकी चढण होती. ट्रेक, दगडामधून रस्ता गेला होता की रस्त्यात मोठे दगड होते हे सांगताच येत नव्हते .वाटेत मोठे मोठे दगड,खडक होते . ट्रेक मध्ये कुठेही झाडे नव्हती . कुंभू (khumbu) व्हॅली पूर्णता ओसाड दिसत होती . नदीमधून पाणी वाहत होते. समोर माउंट एवरेस्ट व इतर शिखरे दिसत होती . शक्य होते तिथे फोटो काढत होतो.

ट्रेक मध्ये जाता जाता काही स्मारके दिसली. त्यावर काही ठिकाणी फोटो लावलेले होते . ही जी सगळी स्मारक होते जे गिर्यारोहक माऊंट एवरेस्ट शिखर सर करताना जे मृत्यूमुखी पडले होते त्यांची ही स्मारके होत. येथे बऱ्यापैकी चढण होती. आता तर ऑक्सिजन अजून विरळ होत चालला होता.साधारण आपल्या शरीरातील लेवल 97 असते ती याठिकाणी 80 च्या जवळपास असे. दुपारचे जेवण करून पुढील ट्रेक सुरू झाला. थंडी चांगलीच जाणवत होती. साडेचार वाजण्याच्या सुमारास आम्ही एव्हरेस्ट बेस कॅम्प येथे पोहोचले. त्या ठिकाणी पोचल्यानंतर खूप आनंद झाला होता. आम्ही एव्हरेस्ट शिखराचे पायथ्यापाशी होतो. तिथपर्यंत पोहोचणे हे काही सोपे नव्हते.

आजही सकाळी दोन उकडलेली अंडी खाल्ली होती. काल दिवस देखील सकाळी दोन अंडी व संध्याकाळी दोन उकडलेली अंडी खाऊनच घालवला होता. शरीरावर परिणाम झालेला होता, वजन घटलेले जाणवत होते. तरी देखील हा ट्रेक अगदी शेवटपर्यंत आम्ही पूर्ण केला हेच विशेष. ग्रुप मधील बहुतेक सर्वांना कफ झालेला होता पण मनाची उमेद मोठी होती म्हणूनच या ठिकाणी आम्ही कोणीही आजारी न पडता कोणासही त्रास न होता. आता 5375 मीटर उंचीवर आम्ही उभे होतो आता आम्ही एव्हरेस्ट बेस कॅम्पच्या टोकावर /जागेवर होतो.

आजचा दिवस आमच्यासाठी विशेष होता. कारण त्यासाठी जगातले सगळे ट्रेकर या ठिकाणी येत असतात. येथूनच पुढे माऊंट एवरेस्ट शिखर सर करण्यासाठी येथूनच सुरवात होते. एवरेस्ट शिखरावर जाणाऱ्या गिर्यारोहकासाठी ज्या सूचना,मार्गदर्शन येथूनच होते त्यात हवामान अंदाजाचे मार्गदर्शन येथूनच होते.

कित्येक गिर्यारोहक ट्रेक मध्येच सोडून परत जातात. पण आम्ही सर्वांनी हा ट्रेक पूर्ण केला होता कोणताही त्रास अडथळा अडचण न येता. एक अनमोल क्षण आमच्यासाठी होता. बेस कॅम्पचे अलीकडे दोन किलोमीटरवर आमचे हॉटेल बुद्ध हे होते. आजचा मुक्काम तेथेच होता. नेहमीप्रमाणे येथे ही झोप जेवण हे शरीराला मानवणारे नव्हते.हवेतील ऑक्सिजन प्रमाण खूपच कमी असते. जो त्रास होत होता तो केवळ ऑक्सिजन कमतरता बाकी शरीराची साथ चांगली होती. कोठेही गुडघे दुखले,पायाने त्रास दिलाय, बीपी वाढला असे कोणाची तक्रार नव्हती. ट्रेक चालत गप्पा मारीत आजचा दिवस आनंदात त्या ठिकाणी काढला. उद्याचा परतीचा प्रवास सुरू होणार होता. सोबत जे फोटो आपणास शेयर करत आहे त्यात आमचा ग्रुप फोटो आहे पाठीमागे माऊंट एवरेस्ट आहे. तसेच मी एवरेस्ट शिखराकडे आशाळभूत, आणि विषम्यक नजरेने शिखराकडे पाहत आहे. माऊंट एवरेस्ट तेचे सोबत उंच शिखरे आहेत . जवळचे आणि लांबचे असेही फोटो आहेत. फोटो प्रतिमा अत्यंत क्लियर आहेत. हे फोटो लॅपटॉपवर पाहीले तर खूप सुंदर दिसतात. मोबाइल वर फोटो प्रतिमा छान दिसत नाही.
आमच्या या आनंदात तुम्ही पण सहभागी व्हा. एवरेस्ट बेस कॅम्पला जाता नाही आले तरी देखील छान सफर फोटो मी शेयर केले आहेत. यावर चांगले प्रवास वर्णन पुस्तक फोटो सह करता येऊ शकते. बघू यात पुढे काय आहे ते. परतीचा प्रवास तीन दिवसाचा आहे तो देखील छान आहे पुढील काही दिवसात तेही लिखाण पूर्ण होईल.
जीवनाच्या फिरतीच्या बकेट लिस्ट मध्ये नसलेले हे ठिकाण नव्याने बकेट लिस्ट मध्ये वाढले. आता कोणीही मोठा एवरेस्ट शिखर करून आला आहे असे बोलणार नव्हते. तेच सर केले होते.
क्रमशः





## पंचाक्षरी कविता

**नाते जपावे, तुटण्याआधी**
**शब्द जपावा, बोलण्याआधी**

## रिटायर्ड माणूस बिचारा काय करेल ....?

———————

## वाचक प्रतिक्रिया -सेवक वार्ता, जून-२०२६

**Excellent. Great attention to details, diversity of news and composition.**
**-Vishwas Savarkar.**

**Very good issue of Sevak warta! Heartiest congratulations Sambhaji! Best wishes for the next issue. -Dr. S. H. Patil**

**I do enjoy going through SEVAK warta.**
**-Shirish Asthana.**

भरपूर माहितीने संपन्न 👌 - M.M. Kulkkarni.

उत्कृष्ट व वाचनीय अंक. मधाची माहिति उदबोधक
-P.K. Kulkarni

## आरोग्य साधना

### तुम्हाला माहित असायला हवं

### "घरकाम नाही, ते घरचं योग": एका पिढीची गोष्ट

- पहाटे ४ वाजता. ६५ वर्षांची आजी उठली.
- पहिले आसन - मालासन: वाकून रांगोळी काढते. २१ ठिपके. प्रत्येक रेषेसाठी मणका वाकतो, पायांच्या नसा ताणल्या जातात. डॉक्टरांनी सांगितलेला Squat Exercise आजीला ६० वर्षांपासून माहिती आहे. "रांगोळी काढली तर गुडघे दुखत नाहीत" असं ती म्हणायची.
- दुसरे आसन - उत्कटासन: कपडे धुणं. दोन पाय थोडे वाकवून, कंबर सरळ ठेवून, हातांनी कपडे दगडावर आपटणं. २० मिनिटं. खांदा, हात, कंबर सगळ्यांचा एकत्र व्यायाम. जिममधल्या Chair Pose + Arm Workout ला आजीने दिलेलं नाव - साडी धुणं.
- तिसरे आसन - त्रिकोणासन: ओले कपडे पिळून, दोरीवर वाळत घालणं. पाय एका बाजूला, हात वर, कंबर वाकवणं. शरीर बाजूला ताणलं जातं. लिव्हर, किडनी शुद्ध होतात.
- चौथे आसन - अधोमुख श्वानासन: वाकून घर झाडणं. रक्तप्रवाह डोक्याकडे जातो. मेंदू तल्लख होतो.
- पाचवे आसन - मार्जारासन: बसून राखेने भांडी घासणं. मनगट, बोटं फिरतात. आर्थरायटिस येत नाही. राखेतला पोटॅश नैसर्गिक जंतुनाशक.
- नातू रवीने विचारलं: "आजी, तू मोलकरणीसारखं एवढं काम का करतेस? एकीला ठेवू शकतेस ना?"
- आजी हसली: "मोलकरीण? अरे बाळा, मी नाही. हे माझं घरचं योग आहे. हे कामं सोडल्यादिवशी माझं अंग जड होईल, मन बिघडेल."
- लक्ष्मम्माची सून दीपा. सॉफ्टवेअर नोकरी. सकाळी उठल्या उठल्या Washing Machine ऑन, Dishwasher ऑन, Robot Vacuum ऑन. ८तास लॅपटॉपसमोर बसणं. मान दुखते, कंबर दुखते, BP, शुगर. संध्याकाळी जिमला २००० रुपये भरून जाते. ट्रेनर सांगतो: "मॅडम, २० स्क्वाट्स करा, १५ मिनिटं Arm Rotation करा, वाकून झाडा."
- दीपाला अचानक वीजेसारखी जाणीव झाली: "अरे, हे सगळं तर आपली सासू पैसे न घेता घरातच करत होती ना! आपण त्याला काम म्हणून हिणवलं. त्यांनी त्याला आरोग्य म्हणून जगलं."
- त्या दिवसापासून दीपा बदलली. मशीन असूनही, रविवारी मुलांसोबत रांगोळी काढते, कपडे धुते. "आई, हे काम नाही, फॅमिली योग टाईम आहे" असं मुलांना सांगितलं.
- चूक कुठे झाली? आपण दोन चुका केल्या. चूक १: नाव बदललं. वाकून रांगोळी काढली तर मालासन, घरात काढली तर मोलकरणीचं काम. बाहेर जिममध्ये केलं तर Fitness, घरात केलं तर Chores. नाव बदलताच आदर बदलला.
- चूक २: हेतू विसरलो. आजीने रांगोळी काढली ती घर सुंदर दिसावं म्हणून नाही. "माझं कुटुंब सकाळी उठल्यावर सुंदर काहीतरी पाहून, चांगल्या मनाने दिवस सुरू करावा" या प्रेमाने. स्वयंपाक केला तो भूक भागवण्यासाठी नाही. "माझ्या हातचं खाल्लं तर माझ्या मुलाला माझं प्रेम, माझी शक्ती मिळावी" या तळमळीने. घर झाडलं ते धूळ जावी म्हणून नाही. "माझ्या घरात येणाऱ्यांना आजार होऊ नयेत" या जबाबदारीने.
- आपण फक्त काम पाहिलं. त्यामागचं प्रेम पाहिलं नाही. तीच आपली चूक.
- योग म्हणजे काय? पतंजली अष्टांग योगात सांगतात: "योग म्हणजे मन, शरीर, श्वास एकरूप करणं." आपल्या आज्यांनी तेच केलं. जमीनच योगा मॅट. घरच योग स्टुडिओ. कुटुंबच योग गुरू.
- शेवटचा शब्द: "हे मोलकरणीचं काम आहे" असं जेव्हा आपण म्हणालो, तेव्हा आपण एका आईच्या प्रेमाचा अपमान केला. "Time Waste" म्हटलं तेव्हा, ५००० वर्षांचं विज्ञान कचऱ्यात टाकलं.
- घरकाम ही गोष्ट काम नाही, ते प्रेम वाटण्याची पद्धत आहे. स्वयंपाक करणं म्हणजे चव नाही, आयुष्य वाढवणं. घर स्वच्छ करणं म्हणजे कचरा नाही, वाईट विचार बाहेर झाडणं.
- यापुढे कोणी "आई, तू इतकं काम का करतेस?" असं विचारलं तर असं सांग: "मी काम करत नाही बाळा. मी माझ्या घरासाठी, माझ्या शरीरासाठी, माझ्या माणसांसाठी योग करते. ही माझी पूजा आहे."
- भारतीय संस्कृतीत काम वेगळं, सेवा वेगळी. काम केलं तर थकवा येतो. सेवा केली तर आनंद मिळतो.
- आपल्या आज्या ९० वर्ष जगल्या त्या जिमला जाऊन नाही, घरालाच देवघर मानून, कामालाच योग बनवून.
- **उद्यापासूनच ठरवायचं घरात काम की योगा!**







## निधन वार्ता



चंद्रकांत हनुमंत पाटील, (सीएच पाटील) सेनि. वन क्षेत्रपाल धुळे रहिवासी करंजी,ता. पारोळा जि. जळगाव, यांचे रात्री पायी जात असताना दुचाकीची त्यांना धडक लागल्याने ते खाली कोसळून मेंदूला जबर मार लागल्याने त्यांचे निधन गुरुवार दिनांक - २३/७/२०२६ रोजी रात्री ८ वाजता वयाच्या ६५ व्या वर्षी अपघाती निधन झाले. त्यांना श्री. धीरज व श्री. गौरव ही इंजिनिअर मुले आहेत. त्यांची अंत्ययात्रा शुक्रवार दिनांक २४/७/२०२६ रोजी दुपारी १:३० वाजता राहत्या घरापासून काढणेत आली होती.

त्यांनी वनपाल धुळे म्हणून काम केले होते. मनाने दिलदार, आज्ञाधारक, उपद्रवी वृत्ती नसलेले व हसतमुख असलेलें पाटील हे सेवानिवृतीनंतरही अनेक बाबतीत इतरांशी संपर्कात असत. त्यांचे निवृत्तीनंतर अनेक प्रोजेक्ट त्यांनी सुरु केले होते, आता ते पुर्ण होण्याचे बेतात असताना त्याचे दुर्दैवी निघून जाणे मनाला चटका लावून गेले. त्यांचे कुटुंबियांच्या अपरिमित नुकसान झाले ते भरून येवू शकत नाही. परमेश्वर त्यांना चिरशांती देवो हीच प्रार्थना. त्यांचे शोकात, दुःखात सेवक संघ परीवार सहभागी असून त्यांना तर्फे भावपूर्ण श्रध्दांजली.

ते सेवक संघाचे धुळे शाखेत आजीवन सभासद होते.



केवळ खाजगी वितरणासाठी

प्रकाशक - सेवक संघ, महाराष्ट्र, पुणे

संपादन - एस. के. गवळी

कार्यालय - वन ग्रंथालय, दुसरा मजला, वनभवन, भांबुर्डा वन विहार, गोखले नगर, पुणे - १६